# मुंबई मेट्रो ३ चे काम ८४ टक्के झाले पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईकरांचा प्रवास आणखी जलद आणि वेगवान व्हावा यासाठी एमएमआरडीएमार्फत मेट्रोचे जाळे उभारण्यात येत आहे. यापैकी कुलाबा ते सीप्झ दरम्यान धावणाऱ्या मेट्रो ३ चे काम अंतिम टप्प्यात असून या प्रकल्पाचे आतापर्यंत ९१ टक्के काम पूर्ण झाले आहे.

कुलाबा ते सीप्झ दरम्यान धावणाऱ्या मेट्रो ३ चे काम दोन टप्प्यांत करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात आरे ते बीकेसी आणि दुसऱ्या टप्प्यात बीकेसी ते कफ परेड दरम्यान करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्याचे काम ९१ टक्के तर दुसऱ्या टप्प्यातील काम ७९ टक्के पूर्ण झाले आहे. या प्रकल्पातील



बोगद्याचे व इतर सिव्हिल कामे ९४.९ टक्के, स्थानकाची कामे ९२ टक्के, बोगद्याचे काम १०० टक्के तर डेपोचे ७४.४ आणि रेल्वे रुळांचे काम ६८.४ टक्के झाले आहे.

पहिल्या टप्प्याचे काम डिसेंबर २०२३ तर दुसऱ्या टप्प्याचे काम जून २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे मेट्रोचे उद्दिष्ट आहे.